**मोहिनी लाड वगैरे वि.**

**पांडुरंग टोपले**

## निशाणी क्रमांक १४४ वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी मयत वादी मोहीनी मोहन लाड यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विलंब माफ होवून मिळणेसाठी केलेला आहे.

२. वादीच्या मते, सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना यातील वादी मोहीनी मोहन लाड हया दि.२६/११/२०१९ रोजी मयत झाले. त्यांचे वारस ९० दिवसात दाखल करणे आवश्यक होते परंतु वादी हे त्यांच्या कामधंद्यात व्यस्त असलेने त्यांना त्यांचे वकीलांना भेटून मुदतीत माहिती देणे शक्य झाले नाही. त्यामुळे वादी मोहिनी लाड यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब जाणीवपूर्वक केलेला नाही. त्यामुळे वादीने मयत मोहिनी लाड हिचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र. १ यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज खोटा असून जास्तीत जास्त खर्च आकारुन नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र. २, ते ५७ यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल न केल्याने अर्जाची चौकशी त्यांचे विना म्हणणे व विना युक्तीवाद चालविणेत आली.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा वादीने हक्कप्रस्थापना व धडेवाटप होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ वादीने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. तसेच, दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी मयत वादी मोहिनी मोहन लाड यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे वादींचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. मयत वादी मोहिनी मोहन लाड यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब रक्कम रूपये ३००/- (रु. तीनेश मात्र) इतका खर्च आकारुन माफ करण्यात येत आहे.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

RANJANA GOVIND KUMBHAR
Digitally signed by RANJANA GOVIND KUMBHAR
Date: 2023.06.28 13:31:20 +0530

दिनांक- २७/०६/२०२३ (श्रीमती आर.जी.कुंभार)

ठिकाण- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

सावंतवाडी.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. filed judgment/order are same word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | U. B. Hundekar (Grade-3) |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Sawantwadi. |
| Judgment/order signed by the P.O.on | : | 27-06-2023 |
| Judgment/order uploaded on | : | 28-06-2023 |